राष्ट्रीय कर्करोग,मधुमेह,हृदयरोग,व पक्षाघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना योजनेअंतर्गत विवेकानंद मेडीकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर,लातूर येथील टर्शरी केअर कॅन्सर सेंटरसाठी केंद्र हिश्श्यापोटी रु.१५९७.५१ लक्ष इतका निधी वितरणास मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः टिसीसी-२०१८/प्र.क्र.२२/आरोग्य ३ अ
गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, दहावा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: १ फेब्रुवारी,२०१८

वाचा -

१. आरोग्य व कुटंब कल्याण मंत्रालय,भारत सरकार यांचे क्रमांक-T-२००१५/०९/ २०१६-CR (NCD-II SECTION)(General) दि.१६ जून,२०१७.
२. सह संचालक,आरोग्य सेवा (असंक) क्र.राआसोम/एफएमजी/कें.हि./८१-८८/१७-१८यांचे दि.६.१.२०१८चे पत्र.

प्रस्तावना -

"राष्ट्रीय कर्करोग,मधुमेह,हृदयरोग,व पक्षाघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना" या योजनेंतर्गत,विवेकानंद मेडीकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर,लातूर येथे टर्शरी केअर कॅंसर सेंटर (TCCC) स्थापन करण्याकरिता केंद्र शासनाने संदर्भाधीन दि.१६ जून,२०१७ च्या आदेशान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी अनुदान उपलब्ध करुन दिले आहे. त्यास अनुसरुन केंद्र हिश्श्याचे अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरिता राष्ट्रीय कर्करोग,मधुमेह,हृदयरोग,व पक्षाघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना" या योजनेंतर्गत विवेकानंद मेडीकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर,लातूर येथे टर्शरी केअर कॅंसर सेंटर (TCCC) सर्वसाधारण योजनेंतर्गत केंद्र शासनाने मंजूर केलेले रु.१५,९७,५१,०००/- (रु.पंधरा कोटी सत्त्याण्णव लाख एक्कावन्न हजार फक्त) इतके अनुदान वितरीत करण्यास या शासननिर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

सदर प्रस्तावावरील खर्च मागणी क्र आर-१,२२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर) राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय मधुमेह कर्करोग व हृदयरोग व पक्षाघात प्रतिबंध नियंत्रण कार्यक्रम ,सर्वसाधारण योजना (General) (२२१० एफ ३८२) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

सदर निधी विवेकानंद मेडीकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर,लातूर यांना अदा करण्यासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून सह संचालक, आरोग्य सेवा (अर्थसंकल्प व प्रशासन), पुणे यांच्याकडे वितरीत करण्यात येईल.

सदर अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर रकमेचे देयक त्यांनी कोषागारात सादर करुन विहीत केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम संबंधित कार्यक्रम अधिका-यांकडे सुपुर्द करावी.

प्रस्तुत प्रकरणी केंद्र शासन/राज्यशासन व विवेकानंद मेडीकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर,लातूर यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारातील अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.११ /अर्थोपाय दि.१०.१.२०१८ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०११८१७०६९३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.02.01 19:22:17 +05'30'

(रा.शा.कौरते)
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई-३२
२. मा.मंत्री (साआवकुक) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२
३. मा.राज्यमंत्री (साआवकुक) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२
४. मा.विरोधी पक्षनेता/विधानसभा/विधान परिषद,विधानभवन,मुंबई
५. महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१,मुंबई
६. महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र-२,नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई .
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी , मुंबई.
९. आयुक्त (कु.क.) तथा संचालक, रा. आ. अ., आरोग्य भवन, मुंबई.
१०. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
११. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, पुणे
१२. उप संचालक,आरोग्य सेवा मंडळ, लातूर मंडळ, लातूर
१३. वित्त विभाग (व्यय -१३ / अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई
१४. नियोजन विभाग (का-१४७२),मंत्रालय,मुंबई
१५. सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प/ लेखा / आरोग्य-७), मंत्रालय, मुंबई.
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर
१७. निवडनस्ती, आ-३ अ